# पुरवठा शाखेचे कामकाज

सार्वजनिक वितरण व्यवस्थे अंतर्गत अधिकृत शिधावाटप/रास्तभाव दुकानातून पात्र लाभार्थ्यांना जीवनावश्यक वस्तुंचा पुरवठा सुरळीत सुरु ठेवण्याचे काम शासनाचे अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागा अंतर्गत करण्यात येते. हे काम सुचारु पध्दतीने करण्यासाठी जिल्हास्तरावर मा जिल्हाधिकारी यांचे नियंत्रणाखाली तसेच तालुका स्तरावर तहसिलदार यांचे नियंत्रणाखाली पुरवठा शाखेमार्फत योजननिहाय निकषाअंती पात्र लाभार्थ्यांना शिधापत्रिका देण्याचे काम करण्यात येते. प्राधान्य गटातील लाभार्थ्यांना त्यांच्या कुटूंबातील सदस्य संख्येनुसार प्रति व्यक्ती ३ किलो गहू व २ किलो तांदूळ याप्रमाणे धान्याचे वितरण दरमहा करण्यात येते. अंत्योदय लाभार्थ्यांना प्रतिकार्डनुसार गहू -२० किलो व तांदूळ-१५ किलो असे एकूण ३५ किलो धान्याचे वितरण प्रत्येक महिन्यात संबंधित रास्त भाव दुकानातून करण्यात येते. जिल्हास्तरावरील पुरवठा शाखेत व तालुका कार्यालयातील पुरवठा शाखेत रु २/- ला विहीत नमुन्यातील अर्ज शिधापत्रिका मिळण्यासाठी सर्वसामान्य नागरीकांकरीता उपलब्ध असतो. १) नवीन शिधापत्रिका मिळणे २)शिधापत्रिकेत नाव वाढविणे ३)शिधापत्रिकेतून नाव कमी करणे ४)शिधापत्रिका रद्द करणे, ५)हरविलेल्या/फाटलेल्या शिधापत्रिकेऐवजी दुय्यम शिधापत्रिका मिळणे, ६)शिधापत्रिकाधारकास त्याच्या नमूद पत्यात बदल करावयाचा असेल तर या सर्व कारणांाठी अर्जाचे वेगवेगळे नमुने विहीत केलेले असून ते संबंधित कार्यालयाकडून अर्जदाराला उपलब्ध करुन देण्यात येतात.

**नवीन शिधापत्रिके करीता खालील प्रमाणे दर आकारण्यात येतात :-**

| अ.क्र. | शिधापत्रिकेचा प्रकार | आकारण्यात येणारे दर रुपये |
|---|---|---|
| १ | पिवळी शिधापत्रिका | रु १०/- |
| २ | केशरी शिधापत्रिका | रु २०/- |
| ३ | शुभ्र शिधापत्रिका | रु ५०/- |
| ४ | दुय्यम पिवळी शिधापत्रिका | रु २०/- |
| ५ | दुय्यम केशरी शिधापत्रिका | रु ४०/- |
| ६ | दुय्यम शुभ्र शिधापत्रिका | रु १००/- |

**कामे पुर्ण करण्यासाठी ठरवून देण्यात आलेली कालमर्यादा :-**

| अ.क्र. | कामाचे स्वरुप | कालमर्यादा |
|---|---|---|
| १ | नविन शिधापत्रिका देणे | ७ दिवस |
| २ | इतर राज्यातून आलेल्या अर्जदारास नवीन तात्पुरती शिधापत्रिका देणे | १५ दिवस |
| ३ | शिधापत्रिकेत नाव वाढविणे | ७ दिवस |
| ४ | शिधापत्रिकेत नवीन जन्मलेल्या मुलाचे नाव वाढविणे ( जन्म दाखल्यासह ) | १ दिवस |
| ५ | शिधापत्रिकेत नोंद असलेल्या लहान मुलांचे एकांके वाढविणे | १ दिवस |
| ६ | हरविलेल्या शिधापत्रिकेऐवजी दुय्यम शिधापत्रिका देणे | १० दिवस |
| ७ | फाटलेल्या/खराब झालेल्या शिधापत्रिकेऐवजी दुय्यम शिधापत्रिका देणे | ३ दिवस |